मी भारताचा नागरिक असेनच तर
असेनच मी माझा शिल्पकार,
माझ्या मनाचा, मेंदूचा
माझ्या वृत्तीचा, वागणुकीचा.
कारण, घटनेने मला दिले आहे
स्वातंत्र्याचे मुली, मूलभूत हक्क स्वातंत्र्याचा.

मी भारताचा नागरिक असेनच तर
माझ्या रोमारोमात भिनली असेल न्याय्यता
विचारांत, वागणुकीत, बोलण्यात, लिहिण्यात
कारण, घटनेने मला दिले आहे
न्याय्यतेचे बाळकडू जन्मापासूनच जन्मासाठी.

मी भारताचा नागरिक असेनच तर
ममतेबरोबरच समताही असेल रुजलेली
मनात, घरात, उगवलेली अंगणात.
कारण, घटनेने मला दिले आहे
समतेचे कंकण, हात बळकट करणारे.

मी भारताचा नागरिक असेनच तर
मनाच्या आसमंतात भरून असेल बंधुता
कुटुंब, जात, वर्ग, धर्म यांच्या पल्याड पोचलेली
कारण, घटनेने मला दिले आहे
बंधुत्वाला जपणारे माणुसकीचे भान.

३०.१.२०१९